रुग्णांवर आकारण्यात येणारा सेवा शुल्क(user fee)
रुग्ण कल्याण समितीच्या बँन्क खात्यात
जमा करण्याबाबत....

# राज्य आरोग्य सोसायटी

परिपत्रक क्र.राआस २००७/प्रक्र २५५/आ ७अ

दिनांक : १३ डिसेंबर २००७

संदर्भ : शासन परिपत्रक क्र.एनआरएचएम २००५/प्रक्र ४२६/आरोग्य ६ दि.३१/१/२००७

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रे/ग्रामीण रुग्णालये इत्यादी ठिकाणी प्रत्येक रुग्ण कल्याण समितीला रुग्णांवर आकारण्यात येणारे शुल्क ठरविण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. वरील निधीचा वापर त्यांनी रुग्णांच्या रुग्णालयीन सोईसुविधांसाठी करणे अपेक्षित आहे. तसेच त्यांनी इतर मार्गाने उदा. देणगी मार्फत अधिक सोईसुविधा. पुरवुन त्यावर वाढीव शुल्क आकारुन यांचे उत्पन्न वाढविणे अपेक्षित आहे.

या संदर्भात अशा सूचना देण्यात येत आहेत की, सर्व रुग्ण कल्याण समित्यांनी त्वरीत वेगवेगळ्या रुग्णालयीन सेवा सुविधांसाठी शुल्क ठरवावे. दिनांक १ जानेवारी २००८ पासुन सदर निधी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रुग्ण कल्याण समितीच्या बँन्क खात्यात जमा करण्यात यावा, व या रक्कमेचा विनियोग केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात यावा.

रुग्ण कल्याण समितीच्या बँन्क खात्यातून धनादेश जारी करण्याचे अधिकार फक्त अधिका-यांना आहेत असे केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे. त्यानुसार कार्यकारी समितीचे सदस्य सचिव व नियामक समितीने ठरवून दिलेले कार्यकारी समितीमधील अधिकारी यांनाच फक्त धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

(वन्दना कृष्णा)
सहअध्यक्ष कार्यकारी समिती
राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी.

प्रति
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
अध्यक्ष,कार्यकारी समिती,जिल्हा आरोग्य सोसायटी

सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
नियामक समिती, जिल्हा आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

अभियान संचालक,
राज्य ग्रामीण आरोग्य अभियान
मुंबई.